Peer Reviewed Journal

ISSN 2319-8648

Impact Factor (SJIF)

Impact Factor - 7.139

# Current Global Reviewer

International Peer Reviewed Refereed Research Journal Registered & Recognized
Higher Education For All Subjects & All Languages

## Changing Religious Movements in Pre-Medieval Indian History

17-18 January 2020 Special Issue - 101 Vol. II

**Chief Editor**
Mr. Arun B. Godam

**Guest Editors**
Dr. B. G. Gaikwad
Principal
Shivaji College, Hingoli (MS)

**Co-Editor**
Dr. Balasaheb Shankarrao Kshirsagar
Head, Department of History
Shivaji College, Hingoli (MS)

**Co-Editor**
Dr. Sandeep G. Londhe
Department of History
Shivaji College, Hingoli (MS)

CURRENT GLOBAL REVIEWER International Multidisciplinary Research Journal | ISSN- 2319-8648
Impact Factor - (SJIF) – 7. 139 | Special Issue -101 ,Vol. II | Jan. 2020 | Peer Reviewerd

प्रा.डॉ.कोंडेकर आर.एस.

20. अजिंठा, वेरुळ लेणी स्थापत्यावर धार्मिक प्रभाव 50
प्रा. राजश्री गुणाजीराव भोपाळे

21. धार्मिक चळवळीतील नाथ संप्रदायाची भुमिर्कर्ङ्क 53
पवार दत्तात्रय विलास

22. धार्मिक चळवळीतील पंडिता रमाबाई यांचे स्त्रियांविषयक कार्य 55
डॉ.संजीवनी चंद्रशेखर बारहाते

23. पूर्व मध्ययुगीन जैन परंपरेतील ब्रम्हशांती यक्ष 57
प्रा.डॉ.प्रकाश महाजन

24. सामरस्य महासागर – वारकरी संप्रदाय 59
प्रा.डॉ.श्रीहरी रंगनाथराव पितळे

25. "पुर्व मध्ययुगीन काळातील धार्मिक चळवळीचा आधुनिक कालखंडावर पडलेला प्रभाव : विशेष संदर्भ :- कॉ.विठ्ठलराव नाईक" 62
डॉ. बी.एस.क्षिरसागर , प्रा. इंगळे एम. एम.

26. पूर्वमध्ययुगीन धार्मिक इंद्रध्वजोत्सव : ऐतिहासिक चिंतन 65
प्रा.डॉ.माधवी गोपीनाथ महाके

27. "वारकरी चळचळ आणि संत ज्ञानेश्वराचे साहित्य : एक प्रबोधन" 68
प्रा. कोकाटे केशव विठ्ठल

28. "कापालिक - एक तंत्र संप्रदाय" 71
खराटे गजानन यशवंतराव

29. धार्मिक चळवळ आणि राजकीय व्यवस्था 73
प्रा.वाघमारे के.एच.

30. वीर वामनराव जोशींच्या राक्षसी महत्वाकांक्षा व रणदुंदुभी या नाटकांच्या माध्यमातुन केलेल्या समाज जागृतीचे ऐतिहासिक अध्ययन. 76
प्रा.संतोष गोपालकृष्ण कुळकर्णी

३१. भक्ती चळवळीतील स्त्रीसंताचे योगदान 78
प्रा.डॉ.दामाजीवाले माधव दिगंबर

32. " धार्मिक व सामाजिक चळवळतील म. बसवेश्वरांचे तत्त्वज्ञान" 81
प्रा. विनायक नथुराम तंत्रे

33. "सामाजिक व धार्मिक चळवळीतील संताचे कार्य आणि योगदान " 84
प्रा. गौतम इंद्रजीत हिंगोले

34. मध्व संप्रदाय-एक अभ्यास 88
प्रा. डॉ. मुटकुळे रामभाऊ

35. वल्लभाचार्यांचा शुद्धोद्वैत -एक अभ्यास 90
प्रा. डॉ. हिंगमीरे डि.पी.

36. शिख धर्माचा उदयः एक ऐतिहासिक अवलोकन 93
प्रा.लकविन्दर कौर बलवंतसिंघ पत्रु,

37. महाराष्ट्रातील संत चळवळीचे राजकीय विचारातील योगदान 96
प्रा.डॉ. एस. यु. ढाले

38. वारकरी संप्रदायाचे मराठवाडयातील सामाजिक योगदान : एक अभ्यास 98

PRINCIPAL
Shivaji College, HINGOLI

CURRENT GLOBAL REVIEWER International Multidisciplinary Research Journal | ISSN- 2319-8648
Impact Factor - (SJIF) – 7. 139 | Special Issue - 101 ,Vol. II | Jan. 2020 | Peer Reviewerd

# "पुर्व मध्ययुगीन काळातील धार्मिक चळवळीचा आधुनिक कालखंडावर पडलेला प्रभाव : विशेष संदर्भ :- कॉ.विठ्ठलराव नाईक"

डॉ. बी.एस.क्षिरसागर
इतिहास विभाग प्रमुख
शिवाजी महाविद्यालय, हिंगोली

प्रा. इंगळे एम. एम.
इतिहास विभाग

**प्रस्तावना :-**

प्राचीन भारताच्या इतिहासात सामाजिक व धार्मिक सुधारणा चळवळीचे युग म्हणुन इ.स.पुर्व सहावे शतक ओळखले जाते. या शतकात तथागत गौतम बुध्द वर्धमान महाविर, चार्वाक इत्यादी तत्वज्ञानाच्या प्रभावातुन मोठया प्रमाणात धार्मिक चळवळीचा प्रारंभ झालेला दिसुन येतो. [१] मध्ययुगीन भारताच्या इतिहासामध्ये पुर्व मध्ययुगीने व उत्तर मध्ययुगीने असे भाग अभ्यासाच्या दृष्टीने पाडले जातात. हया काळात मोठया प्रमाणात धार्मिक चळवळीचा उदय झाला. हया मध्ये प्रामुख्याने सुफी संप्रदाय, संत परंपरा, भक्ती चळवळ व इतर वेगवेगळया धार्मिक चळवळीच्या माध्यमातुन लोकामध्ये धार्मिक व सामाजिक सुधारणा होण्यास सुरूवात झाली.[२] साहजिकच प्राचिन धार्मिक चळवळीचा प्रभाव मध्ययुगीन धार्मिक चळवळी वर झालेल्या दिसुन येतो.

**मध्ययुगीन धार्मिक चळवळीचा उद्देश / हेतु.**

१. एकटेश्वर वाद २) धार्मिक सहिष्णुता वृन्दीगत करणे, ३) अस्पृश्यतेला कडाडुन विरोध करणे.
४) धार्मिक रूढी, परंपरा व अधंश्रध्देला विरोध करणे. ५) एकराष्ट्रीयत्साची भावना वृन्दीगत करणे.

ही मध्ययुगीन धार्मिक चळवळीची मुख्य उद्देश होते.[३] मध्ययुगीन धार्मिक चळवळीचा प्रभाव आधुनिक कालखंडावर पडलेला स्पष्ट दिसुन येतो. हयातुनच १९ व्या शतकात मोठया प्रमाणात सामाजिक व धार्मिक सुधारणा चळवळी भारतात झाल्या. हयाच चळवळीचा प्रभाव कॉ.विठ्ठलराव नाईक यांच्यावर झाला. प्रस्तुत शोध प्रलंबामध्ये कॉ.विठ्ठलरावांच्या स्वातंत्र्यउत्तौर काळातील धार्मिक चळवळीच्या माध्यमातुन केलेल्या कार्याचा उल्लेख लिहिण्याचा प्रयत्न केला. त्याचे कार्यक्षेत्र निजाम कालिन परभणी जिल्हा व त्याच्या सिमावर्ती भाग होय. आताचा हिंगोली जिल्हा येतो.

**जिवन परिचय**

कॉ.विठ्ठलराव नाईक यांचा जन्म ०१.०८.१९२२ हिंगोली जिल्यातील कळमनुरी तालुक्यातील चिचोर्डी या गावी झाला. वडिलाचे नाव चंपतराव नाईक तर आईचे जिजाबाई होते. वडिलाची आर्थिक परिस्थिती बिकट होती. तीन भाऊ व एक बहिण असा चार भावडांमध्ये विठ्ठलरावाचा नंबर पाचचा होता.[४] बालपण व शिक्षण अतिषय वाईट परिस्थीतीत गेले. प्राथमिक शिक्षण व बालपण वारंगा (म्हसई) ता.कळमनुरी जि.हिंगोली येथे पुर्ण झाले. माध्यमिक शिक्षण जेठमलानी राष्ट्रीय विद्यालय (उमरखेड) जि.यवतमाळ येथे शिकत असतांनाच विठ्ठलरावांच्या व्यक्ती महत्वाची जडण-घडण होत गेली. संघटन, नेतृत्व, चळवळ व भारतीय राष्ट्रीय आंदोलनात सहभाग घेणे येथुनच विठ्ठलरावांनी सुरू केली. स्वातंत्र्यउत्तोर काळात मराठवाडा मुक्ती सग्रामात १० विच्या वर्गात असतांनाच अर्धवट शिक्षण सोडुन पुर्ण वेळ मराठावाडा मुक्ती संग्रामाच्या आंदोलन्नात पुर्ण वेळ सहभागी झाले. स्टेट कॉग्रेसच्या आदेशावरून दिपाजी पाटला बरोबर 'शेंबाळ पिंपरी शस्त्र कॅम्प' येथे कॅम्प्टन प्रमुख पदि राहुन त्यांनी असहाकर कायदेभंग, जंगल सत्याग्रह, तरोडगिरी नाके उध्दवस्त केले. रोहिले रझाक स्मारक केद्रांवर हल्ले चढविले. स्वयकिय देशद्रोही गुंडाचा बंदोबस्त करणे, निजाम पोलीस व लष्करी तुकडीशी समोरासमोर लढणे या सशस्त्र क्रांतीचे नेतृत्व करणाऱ्या पैकी कॉ.विठ्ठलराव नाईक अग्रणी होते.

स्वातंत्रउत्तोर काळात ही कॉ.विठ्ठलराव नाईक यांचे कार्य उल्लेखनिय आहे. त्यांच्या कार्याची पावती म्हणुन कळमनुरी मतदार संघातील जनतेने इ.स.१९६७-७२, १९७२-७८, १९७८-१९८०, १९९५-१९९९ सतत ४ वेळेस आमदार म्हणुन निवडुन दिले.[५] कॉ.विठ्ठलराव नाईक यांच्यावार महत्वपुर्ण शिवाजी महाराज, डॉ.आंबेडकर, महात्मा गांधी व कम्युनिष्ठ विचार सारणीचा मध्ययुगातील धार्मिक चळवळीचा प्रभाव होता.जिवनाच्या शेवटपर्यंत त्यांनी सामाजिक व धार्मिक चळवळीच्या माध्यमातुन केलेले कार्य उल्लेखनिय आहे.

**विठ्ठलरावाचा विवाह व अस्पृश्यतेची होळी**

मराठवाडा मुक्ती संग्रामता विठ्ठलराव नाईक पुर्ण सक्रिय असल्यामुळे त्याची सोयरक होत नव्हती. तेव्हा खालील नैतिक म्लणजे मानसे मान्या अशी विठ्ठलरावांची ख्याती होती. त्याच्या सहकाऱ्यांनी व नातेवाईकांनी अनेकदा प्रयत्न केले पण विवाहाचा योण जुळुन येत नसे. शेवटी प्रयत्नांनी त्यांच्या सहकाऱ्यानी गणपतराव लेकुळे जामगव्हाण, संभाराव नाईक येलकी, दत्तराव भुतनर सावंगी इत्यादी नातेवाईकांनी कोळसा येथील आताचा जि.हिंगोली तालुका सेनगाव होय. गोविंदराव बेंगाळ यांची द्वितीय कन्या रूख्मीनी हिच्याशी सोयरीक झाली. व रितीरिवाजाप्रमाणे विठ्ठलरावाचे लग्न वयाच्या ३५ व्या वर्षी म्हणजे इ.स.१९५६ या वर्षी पार पाडले.[६]

PRINCIPAL
Shivaji College, HINGOLI

१९५६ चा काळ म्हणजे महाराष्ट्रात व देशात मोठ्या प्रमाणात जातियता, अस्पृश्यता व पारंपारिक रूढी होत्या. विठ्ठलराव नाईक चळवळीमध्ये सक्रिय असल्यामुळे वेगवेगळ्या समाजातील लोकांशी त्यांच्या घनिष्ठ संबंध होता. त्यांच्या विवाहाला ८०% लोक दलित समाजातील होते. म्हणजेच बौध्द, मांग, चंभार, तेली, तांबोळी व आदिवासी, मराठा इत्यादी तर २०% लोक त्यांच्या समाजातील होते. लग्न विधीला यात्रेचे स्वरूप आले होते. हाटक समाजामधूनच विठ्ठलराव नाईक होते. त्यांना ही नाईक ही पदवी होती. समाजामध्ये पाटील म्हणून समजत होते हा ही समजत स्वतःच्याला तत्कालीन काळात स्वतःला श्रेष्ठ समाज होता. त्यांच्या नातेवाईकांना दलित समाजातील लोका मोठ्या प्रमाणात आलेला पाहुन असंतोष निर्माण झाला.

लग्न विधी पार पाडल्यानंतर जेवणासाठी पत्नी बसल्या परंतू नातेवाईकांनी दलित समाजातील लोकांना सोबत पंक्तीत बसविण्यास नकार दिला. कारण तत्कालीन काळात दलित म्हणुन जनतेला लोकांना सोबत पंक्तीत बसवित नसत त्यांच्या स्वतंत्र पंक्ती असत. परंतु विठ्ठलराव नाईकांवर सर्व समाजातील लोकांना एकत्र पंक्तीत बसविले. गावातील प्रस्थापित लोकांनी नाके मुरडली.

१९५६ च्या काळात हिंगोली जिल्ह्यातील तालुका सेनगावातील कोळसा ह्या खेडेगावात सर्व जाति धर्मातील लोकांना एकत्र बसवून अस्पृश्यता नष्ट करण्याचा प्रयत्न केला. हे विशेष उल्लेखनिय होय. जेवन झाल्यानंतर पंक्ती उठल्यावर गावातील प्रतिगामी लोकांनी पतरवाळ्या उलचण्यास विरोध केला. हे विठ्ठलरावांना समजात स्वतः विठ्ठलराव पतरवाळ्या उचलू लागले. व प्रतिगामी लोकांना उद्देशुन म्हणत ते ही माणसेच आहेत. हा कुठला मानवतावाद आहे. तेंव्हा त्यांच्या सर्व सहकारी पतरवाळ्या उचलल्या त्यांच्या लग्नात मोठा धार्मिक वाद झाला होता. परंतू त्यांच्या सहकाऱ्यांनी सैनिकांची भूमिका पार पाडली व लग्नविधी संपन्न झाला. विठ्ठलराव नाईक यांच्यावर मध्यकाळातील सुफी संप्रदाय व भक्ती चळवळीचा प्रभाव होता हे स्पष्ट होते. खऱ्या अर्थाने विठ्ठलरावांनी त्यांच्या लग्नात अस्पृश्यतेची होळी केली.[७]

**माळधामणी गावातील धार्मिक तनावाच्या स्थितीवर विठ्ठलरावांनी मात केली.**

माळधामणी हे गाव ता.जि.हिंगोली मधिल असुन गावामध्ये दर्शनी स्थळी मारोतीचे मोठे मंदिर आहे. तत्कालीन परिस्थत अस्पृश्यांना मंदिरात प्रवेश नव्हता. इ.स.१८८५ मध्ये गावातील सामाजिक चळवळीतील तरूण मारोतराव मोतीराव ढगळे हयांनी मंदिरात प्रवेश केला व देवाचे दर्शन घेतले. वेळ दुपार ४ ची होती. गावातील काही लोकांनी हे दृश्य पाहिले. तेंव्हा काहीही म्हटले नाही. परंतु सायंकाळी गावातील प्रतिगामी लोकांनी मारोती हया तरूणास मारण्याचा प्रयत्न केला. परंतु बौध्द समाजातील लोकांनी व समाजातील तरूणांनी त्यांचा हाक हाणुन पाडला. प्रचंड गावामध्ये धार्मिक तणाव निर्माण झाला. गावातील लोकांनी कॉ.विठ्ठलराव नाईक यांच्याशी संपर्क साधला त्यावेळेस विठ्ठलराव नाईक आमदार होते. कळमनुरी ते माळधामणी हे गांव १२ कि.मी. चे होते ताबडतोब विठ्ठलराव नाईक माळधामणी या गावामध्ये आले. व दोन्हीही समाजातील लोकांना एकत्र बसुन जी काही तणावाची स्थिती होती. त्या स्थितीला शांत करण्यास विठ्ठलराव नाईक यांना यश आले. सर्व माणसे ही समान आहेत, इश्वरानी काही फरक केला नाही तर आपण कोण आहे. असा उपदेश गावातील प्रतिगामी लोकांना केला. तेंव्हा गावातील प्रतिगामी लोक शांत झाले.[८] १८८५ मध्ये ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणात अस्पृश्यांना मंदिर प्रवेश बंद होता. आजही २१ व्या शतकात सुध्दा असे अनेक उदाहरण पेपरमध्ये वाचायला मिळतात. तेंव्हा विठ्ठलरावांनी माळधामणी गावातील जे काही धार्मिक तेढ निर्माण झाले होते. ते मिटवला व मोठा अनर्थ टाळला. विठ्ठलरावाच्या हया कार्यामुळे माळधामणी गावातील मारोतीचे मंदिर सर्वांसाठी खुल्ले आहे. खऱ्या अर्थाने विठ्ठलरावांनी हया कार्यातुन लोकांमध्ये धार्मिक सहिष्णुतेची भावना निर्माण केली हे स्पष्ट होते.

**सारांश :-**

प्राचीन भारताच्या इतिहासात इ.स.पुर्व ६ व्या शतकात धार्मिक चळवळीच्या माध्यमातुन बौध्द धर्मांचा उदय, जैन धर्मांचा उदय व चार्वाक इत्यादीचा माध्यमातुन फार मोठा धार्मिक परितर्वन झाले. धार्मिक चळवळीचा प्रभाव मध्ययुगात दिसुन येतो. सुफी संप्रदाय, संत परंपरा व चळवळी इत्यादी धार्मिक चळवळी निर्माण झाल्या मध्ययुगीन धार्मिक चळवळीचा प्रभाव आधुनिक काळात स्पष्ट दिसुन आला. म्हणुन १९ वे शतक हे सामाजिक व धार्मिक सुधारणा चळवळीचे युग म्हणुन ओळखले जाते.

हयात धार्मिक चळवळीने कॉ.विठ्ठलराव नाईक प्रभावीत झाले. स्वातंत्र्यउत्तोर काळातील इ.स. १९५६ मध्ये त्यांचा विवाहाच्या वेळेस धार्मिक तणाव निर्माण झाला होता. तेंव्हा त्यांनी प्रत्यक्ष कृतीच्या मार्गातुन सर्व जातिच्या लोकांना एकत्र पंक्तीत जेवायला बसविले. विशेष दलित वर्गातील संख्या मोठ्या प्रमाणात उपस्थित होती. हे विठ्ठलरावांचे अस्पृश्यता निवारण्याचे फार मोठे कार्य होते. तसेच माळधामणी या गावातील इ.स.१९८५ मध्ये दलित तरुणाने मारोती मंदिरात प्रवेश केला व दर्शन घेतले त्यामुळे मोठा धार्मिक वाद निर्माण झाला होता. तेंव्हा विठ्ठलरावांनी हा धार्मिक वाद मिटविला व धार्मिक सलोख्य घडुन आणले. १९ व्या शतकातील भारतातील अनेक समाज सुधारका प्रमाणे विठ्ठलराव नाईक यांचे कार्य हिंगोली जिल्हयात अग्रनी होते.

**निष्कर्ष :-**

१. कॉ.विठ्ठलराव नाईक यांनी धार्मिक चळवळीच्या माध्यमातुन जातीय व्यवस्थेला विरोध केला.
२. लोकांमध्ये धार्मिक सहिष्णुतेची भावना निर्माण झाली.
३. अस्पृश्यतेला विरोध केला.
४. लोकांमध्ये एकराष्ट्रीत्वाची भावना उदिगत केली.
५. धार्मिक रूढी परंपरा व अंधश्रध्दा नष्ट करण्याचा प्रयत्न केला.

PRINCIPAL
Shivaji College, HINGOLI

CURRENT GLOBAL REVIEWER International Multidisciplinary Research Journal | ISSN- 2319-8648
Impact Factor - (SJIF) – 7. 139 | Special Issue - 101 ,Vol. II | Jan. 2020 | Peer Reviewerd

**संदर्भ सुची :-**

१. नागोरी. एस.एन., प्राचिन भारतीय चिन्तर का इतिहास,नॅशनल पब्लिकेशन हाऊस
३७७ चौडा रस्ता, जयपुर, पृष्ठ,७४

२. सतिष चंद्र, मध्यकालीन भारत राजनितीक समाज और संस्कृती, ओरियंन्ट लॉथमैन प्रा.लि. असफ अली, रोड नवी दिल्ली,१८२

३. सतिष चंद्र, मध्ययुगीन भारत, के. सागर पृष्ठ-५१९

४. शाहिर कोंदुरकर, लोकशिक्षक शाहिर कोंदुरकर रची पोवाडा, विठ्ठलराव नाईक यांच्या जन्माचा इतिहास पृष्ठ-२९

५. प्रत्यक्ष मुलाखात,नामदेव इंगोले रा.वारंगा (मसाई) ता.कळमनुरी जि.हिंगोली.

६. प्रत्यक्ष मुलाखत,नामदेव इंगोले रा.वारंगा (मसाई) ता.कळमनुरी जि.हिंगोली.

७. प्रत्यक्ष मुलाखत, मारोतराव मोतीराम इंगळे

PRINCIPAL
Shivaji College, HINGOLI